मुक्तागिरी

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव स्पर्धेचा निकाल जाहीर

## लोकनृत्य स्पर्धेत छ. शिवाजी कॉलेज प्रथम, सुंदर आणि शिस्तशीर नियोजन, युवकांचा कलाज्ञानानंद उत्सव जल्लोषात

**सातारा :** शिवाजी विद्यापीठाचा ४१ वा सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सव छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे कोरोनाच्या सर्व प्रकारच्या शासकीय नियमांचे पालन करून जल्लोषात साजरा झाला. या युवा महोत्सवात १४ प्रकारच्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते .त्याचा निकाल जाहीर झाला असून वैयक्तिक सहभागाच्या स्पर्धेत मराठी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक इस्माईल साहेब मुल्ला लॉ कॉलेज सातारा ,द्वितीय क्रमांक छत्रपती शिवाजी कॉलेज ,सातारा व तृतीय क्रमांक गव्हर्मेंट कॉलेज ऑफ इंजिनियरिंग ,कराड यांनी मिळविला. हिंदी वक्तृत्व स्पर्धेत कला वाणिज्य महाविद्यालय सातारा या महाविद्यालयाने प्रथम क्रमांक .डी.पी.भोसले कॉलेज कोरेगाव यांनी द्वितीय क्रमांक व मुधोजी कॉलेज फलटण यांनी तृतीय क्रमांक मिळविला. इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत वेणूताई चव्हाण कॉलेज ,कराड यांनी प्रथम ,गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कॉलेज कराड यांनी द्वतीय तर डी.पी.भोसले कॉलेज ,कोरेगाव यांनी तृतीय क्रमांक मिळविला. वादविवाद स्पर्धेत गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कॉलेज कराड यांनी प्रथम ,इस्माईल मुल्ला लॉ कॉलेजने द्वितीय तर डी.पी.भोसले कॉलेज ,कोरेगाव यांनी तिसरा क्रमांक मिळविला. सुगम गीत गायन स्पर्धेत गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कॉलेज कराड यांनी प्रथम,लालबहादूर शास्त्री महाविद्यालय ,सातारा यांनी द्वितीय तर सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड यांनी तृतीय क्रमांक मिळविला.



भारतीय समूहगीत स्पर्धेत सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड यांनी प्रथम क्रमांक मिळविला तर द्वितीय क्रमांक यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स यांनी तर तिसरा क्रमांक धनंजयराव गाडगीळ महाविद्यालय सातारा यांनी मिळविला. एकांकिका स्पर्धेत प्रथम क्रमांक सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड,द्वितीय क्रमांक सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय ,सातारा व तिसरा क्रमांक छत्रपती शिवाजी कॉलेज,सातारा यांनी मिळविला.लघुनाटिका स्पर्धेत प्रथम क्रमांक धनंजयराव गाडगीळ महाविद्यालय ,सातारा,द्वितीय क्रमांक मुधोजी महाविद्यालय फलटण, तर तृतीय क्रमांक यशवंतराव चव्हाण इन्स्टीट्युट ऑफ सायन्स या महाविद्यालयाने मिळविला. नकलांच्या स्पर्धेत यशवंतराव चव्हाण इन्स्टीट्युट ऑफ सायन्स या महाविद्यालयाने प्रथम ,मुधोजी कॉलेज फलटण यांनी द्वितीय तर बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण यांनी तृतीय क्रमांक मिळविला. पथनाट्य स्पर्धेत सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड,छत्रपती शिवाजी कॉलेज ,सातारा द्वितीय ,यशवंतराव चव्हाण इन्स्टीट्युट ऑफ सायन्स ,सातारा यांनी तृतीय क्रमांक संपादन केला. लोकनृत्य स्पर्धेत छत्रपती शिवाजी कॉलेज ,सातारा यांनी प्रथम ,धनंजयराव गाडगीळ महाविद्यालय सातारा यांनी द्वितीय तर यशवंतराव चव्हाण इन्स्टीट्युट ऑफ सायन्स ,सातारा यांनी तृतीय क्रमांक मिळविला.लोककला स्पर्धेत सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड यांनी प्रथम क्रमांक मिळविला .द्वितीय क्रमांक दहिवडी कॉलेज दहिवडी यांनी तर तृतीय क्रमांक किसनवीर महाविद्यालय वाई कॉलेजने मिळविला. लोकसंगीत व वाद्यवृंद स्पर्धेत मुधोजी महाविद्यालय फलटण यांनी प्रथम क्रमांक तर डी.पी.भोसले कॉलेज कोरेगाव यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. शिवाजी विद्यापीठाच्या सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विविध स्पर्धत विजेत्या ठरलेल्या सर्व विजेत्यांचे व विजेत्या संघांचे अभिनंदन छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ.व्ही.एस.शिवणकर, शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सव समितीचे सचिव व विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ.आर.व्ही.गुरव,युवामहोत्सवसमितीचे सदस्यप्राचार्यडॉ.वाय.बी.गोंडे, प्राचार्य डॉ.व्ही.एम.पाटील,प्राचार्य डॉ.एल.जी. जाधव, सातारा जिल्हा सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ.सी.यु.माने, सातारा जिल्हा युवा महोत्सवाच्या प्रमुख चेअरमन डॉ. रोशनआरा शेख यांनी केले.छत्रपती शिवाजी कॉलेजने सर्व प्रकारची व्यवस्था करून योग्य काळजी घेऊन युवा महोत्सव आयोजन चांगले व वेळेत केल्याबद्दल शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव समितीने समाधान व्यक्त केले.

या युवा महोत्सवात छत्रपती शिवाजी कॉलेजने लोकनृत्य स्पर्धेत प्रथम,पथनाट्य स्पर्धेत द्वितीय ,मराठी वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय ,तर एकांकिका स्पर्धेत तृतीय क्रमांक संपादन केला ,अशी माहिती महाविद्यालयाच्या सांस्कृतिक व युवा महोत्सव समितीच्या चेअरमन उपप्राचार्या डॉ.रोशनआरा शेख यांनी दिली. छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, कमवा आणि शिका योजनेचे विद्यार्थी, एन.सी.सी.चे विद्यार्थी, वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांनी यशस्वी आयोजनासाठी सहयोग दिला. सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाच्या संघव्यवस्थापक यांनी सहकार्य केले.

Daily Muktagiri published by printer, publisher, owner and editor Anil Shivajirao Desai printed at Muktagiri Press, 455/2/17, Sadarbazar, Satara and published at Shivsampada, 46, M